दिनांक २६.०८.२०२५ रोजी–

**अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर पुढील उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस.,विधीज्ञ यांचे द्वारा सुरू–**

५७. आरोपी क्र.२ ह्या लेखा लिपीक म्हणून नौकरीला होत्या असेच माझे म्हणने आहे. हे म्हणने खरे आहे की, आरापी क्र.२ चे काम कार्यालयात आलेली रोख रक्कम जमा करून घेणे, त्याच्या पावत्या फाडणे, जमा झालेली रक्कम बँकेत भरणे, कॅशबुकमध्ये सर्व नोंदी ठेवणे व खर्चाच्या नोंदी ठेवणे हे आहे. हे म्हणने खरे आहे की, बँकेचे दर महिन्याचे स्टेटमेंट मागविणे व ते झालेल्या कॅशबुक मधील नोंदीप्रमाणे हे तपासण्याचे काम लेखा विभागाचे आहे. हे म्हणने खरे आहे की, लेखा विभागाचे महत्वाचे काम म्हणजे, बँकेशी अकाउंट संबंधीचा पत्र व्यवहार हा आहे. हे म्हणने खरे आहे की, लेखा विभागाचा दर महिन्याचा लेखाजोखा तपासण्याचे काम हे श्री. संजय सबनिस यांचे होते. हे म्हणने खरे आहे की, बँक स्टेटमेंट, कॅशबुकच्या सर्व नोंदी ह्या श्री. संजय सबनिस हे स्वतः तपासत होते व त्याप्रमाणे त्या नोंद ठेऊन स्वतः सही करत. हे म्हणने खरे आहे की, अकाउंट संबंधी जो काही दरमहिन्याचा सर्व पत्रव्यवहार होत हे श्री. संजय सबनिस हे तपास होते व हे पण त्यांच्याच अख्त्यारीत येत होते. हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनिस यांनी त्यांचे हे काम न केल्याने त्यांच्यावर काहीही कारवाई झालेली नाही, असे माझे म्हणने आहे. ते त्यांचे पुर्ण काम रितसर करीत.

५८. हे म्हणने खरे नाही की, विभागीय क्रिडा संकुल समिती व क्रिडा व युवक सेवा कार्यालय यांचे नियमित लेखा परिक्षण होते. माझे असे म्हणने नाही की, विभागीय क्रिडा संकुल समिती व क्रिडा व युवक सेवा कार्यालय यांची जी नियमावली (बायलॉज) आहे त्याचे पुर्णपणे पालन होत नव्हते. हे म्हणने खरे आहे की, या नियमानुसार शासनातर्फे जो काही निधी येतो त्याचे दरवर्षी लेखा परिक्षण करणे बंधनकारक आहे. मी माझ्या तक्रारीत अथवा जबाबात आमचे कार्यालय लेखा परिक्षणाचा नियम पायदळी तुडवित होते असे म्हटलेले नाही. पोलीसांनी आमच्या कार्यालयाचे मागील वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल मागीतले त्यावेळेला लेखा परिक्षणाची फाईल पाहीली असता लेखा परिक्षण न झाल्याचे आढळून आले. विभागीय क्रिडा संकुल समिती श्री. संजय सबनिस यांचे वरिष्ठ जिल्हाधिकारी, औरंगाबाद हे आहेत व क्रिडा व युवक सेवा विभागासाठी श्री. संजय सबनिस यांचे वरिष्ठ हे सह–संचालक, पुणे हे आहेत. सन २०२२ नंतर विभागीय क्रिडा संकुल संमितीचे लेखा परिक्षण झालेच नाही. सन–२०२२ मध्ये कोरोना नव्हता व तो संपलेला होता. सन २०२२ पासून ते सन २०२४ या कालावधीत लेखा परिक्षण झाले नाही म्हणून श्री. संजय सबनिस यांना वरिष्ठांकडुन नोट आली किंवा नाही याबद्दल मला काही माहीत नाही. सन–२०२२ पुर्वीचे लेखा परिक्षणाचे अहवालसुध्दा मला माहीत नाही व ते मी पाहिलेले नाहीत. मी विभागीय क्रिडा संकुल समितीचे लेखा परिक्षण झालले नाही हे पोलीसांना

सांगीतलेले नाही. मी सन–२०१५ ते २०१९चा लेखा परिक्षण अहवाल पोलीसांना दिला. या लेखा परिक्षणाचे लेखा परिक्षक कोण? हे मी पाहिले नाही व मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, लेखा परिक्षणाच्या वेळेला लेखा लिपीक, लेखा विभागातील संबंधीत अधिकारी व उपसंचालक हे हजर राहत. हे म्हणने खरे आहे की, लेखा परिक्षणाच्या वेळेला जे काही लागेल त्याची माहीती देणे व त्या संबंधीत कागद देणे हे सर्व काम हे त्याच लोकांचे होते. विभागीय क्रिडा संकुल समितीचे लेखा परिक्षण होत नाही या विषयीची माहीती श्री. संजय सबनिस यांनी मला दिली नाही.

**५९.** इंडीयन बँकेतील बँक खाते हे विभागीय क्रिडा संकुल समितीच्या नावाने आहे. इंडीयन बँक, शाखा जालना रोड, औरंगाबाद येथे जाऊन काही व्यवहार करणे या बाबतचे अधिकार मला दिलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, आरोपी क्र.१ यास बँकेत जाऊन पत्र व्यवहार करणे, बँकेतील रकमा काढणे, रकमा जमा करणे, बँकेचे स्टेटमेंट काढणे, बँकेशी कम्युनिकेट करणे याबाबतचे लेखी अधिकार दिलेले नाहीत. हे सर्व अधिकार हे उपसंचालक यांना आहेत याबद्दल मला काही माहीत नाही. हे म्हणने खरे नाही की, मला हे माहीत नाही त्यामुळे श्री. महाद्वाड आणि श्री. अशोक गिरी हे कोण मला माहीतीच नाही व त्यांचे कागदपत्रे कागदपत्र मला बघण्याचा योग आलाच नाही. मला श्री. महाद्वाड यांनी बँकेला काय लिहून दिले अथवा कळविले हे बघण्याचा योग मला आलेला आहे. हे म्हणने खरे नाही की, हे माहीती असुन सुध्दा बँकेला काय पत्र व्यवहार केला हे मी प्रथम खोट सांगीतलेल आहे. तक्रार दाखल करे पर्यंत इंडीयन बँक,जालनारोड शाखा औरंगाबाद विभागीय क्रिडा संकुल समितीचे खाते यावर सहीचे अधिकारी श्री. संजय सबनिस यांचे होते. हे म्हणने खरे आहे की, श्री. महाद्वाड व श्री. अशोक गिरी यांनी माझ्या समक्ष कोणत्याही कागदांवर सही केलेली नाही. हे म्हणने खरे आहे की, श्री. महाद्वाड, श्री. सुहास पाटील व श्री. अशोक गिरी यांनी माझ्या समक्ष कधीही सही केलेली नसल्यामुळे त्यांची सही ओळखणे याचा माझेशी काहीही संबंध नाही. <u>निशाणी क्र.६१</u>–श्री अशोक गिरी यांनी दिलेले नमुना स्वाक्षरीसाठी दिलेले पत्र व <u>निशाणी क्र.६२</u>–हे श्री. संजय सबनिस यांचे सही नमुना पत्र मला दाखविले. हे म्हणने खरे नाही की, यावरील सह्या ह्या कोणाच्या आहेत हे मला श्री. संजय सबनिस यांनी मला सांगीतले. मला या निशाणी क्र.६१ व नि.क्र.६२ पत्रांवरील सह्या कोणाच्या आहेत हे कार्यालयातील कोणत्याही कर्मचा–याने अथवा अधिका–याने सांगीतलेले नाही.

**६०.** मला माझे सरतपासातील क्रमांक–९ मध्ये नमुद यशोदा शेट्टी लेखा लिपीक व हर्षकुमार क्षिरसागर संगणक ऑपरेटर म्हणून नमुद आहे, हे बरोबर आहे. तक्रार दाखल करेतो पर्यंत विभागीय क्रिडा संकुल समितीच्या खात्यामधून पैसे काढण्याचा संपुर्ण अधिकारी श्री. संजय

सबनिस यांचा होता. हे खाते गव्हरमेंट बचत खाते प्रकारात आहे. हे खाते विशेष का सर्वसाधारण याबद्दलही मला माहीत नाही. तक्रार दाखल तारखेपर्यंत श्री. संजय सबनिस यांना खात्यातुन रक्कम काढण्याचा अधिकार कधीही रद्द झालेला नाही. इंडीयन बँकेत श्री. संजय सबनिस यांचे सोबत जाण्याचा योग मला आला नाही. मी तक्रार दाखल करण्यापुर्वी एकटा बँकेत गेलेलो आहे. हे म्हणने खरे आहे की, मला बँकेशी कोणतेही व्यवहार करणे या बद्दल कोणताही अधिकार नाही अथवा ते माझ्या कर्तव्यसुचीतही नाही. मला व्यवहार करणे अथवा बँकेत जाणे बाबत कोणताही अधिकार नसतांना मी बँकेत श्री. संजय सबनिस यांच्या सांगण्यावरून तक्रार दाखल होण्यापुर्वी गेलो. मी बँकत जाणे, माझ्या ड्यटी लिस्टमध्ये नाही, ते मी करणार नाही ते मी श्री. संजय सबनिस यांना सांगीतले नाही. हे म्हणने खरे आहे की, वरिष्ठ जे सांगतील ते ऐकण्याचा माझा स्वभाव आहे. मी बँकेत एकटा श्री. संजय सबनिस यांच्या सांगण्यावरून तक्रार दाखल करण्यापुर्वी गेलो हे मी पोलीसांना सांगीतलेले नाही.

**६१**. हे म्हणने खरे आहे की, इंडीयन बँकेने विभागीय क्रिडा संकुल समितीस अथवा श्री. संजय सबनिस यांना त्यांच्या सहीचे बोगस पत्र प्राप्त झालेले आहे याबद्दल कळविलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष श्री. सुनिल केंद्रेकर यांचे निर्देश पत्र दिनांक २८.०२.२०१९ रोजीचे बँक खात्याच्या व्यवहाराचे मी जाणुनबुजुन पोलीसांना अथवा मा. न्यायालयात दिलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, दिनांक २८.०२.२०१९ रोजीचे श्री. सुनिल केंद्रेकर विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष याचे पत्र मी पोलीसांना दिलेले आहे. मी जबाबात तसा पत्राचा उल्लेख केलेला नाही. मला हे पत्र दिनांक २८.०२.२०१९ रोजीचे न्यायालयात अभिलेखावर का नाही हे मला सांगता येणार नाही. निशाणी क्र.५६ व निशाणी क्र.७० अधिकार पत्र यामध्ये विभागीय क्रिडा संकुल समितीच्या खात्यावर किती रक्कम शिल्लक आहे हे लिहलेले नाही. मला पोलीसांनी या शिल्लक रकमेबद्दल विचारले होते. तक्रार देतांना रक्कम रुपये एक कोटी अडोतीस लाख नऊशे काहीतरी शिल्लक आहे असे सांगतीले होते. या रकमेबद्दल माझ्या निशाणी क्र.६६ फिर्याद जबाबामध्ये का मजकुर नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मला सरतपासामध्ये खात्यावरील शिल्लक रक्कम किती हे सांगायला कोणीही सांगीतले नाही. मी ही रक्कम शिल्लक स्वतःहून सांगीतलेली आहे व नवीन बदल मी स्वतःहून सांगीतलेला आहे.

**<u>मा. आरोपी क्र.१ च्या वकीलांच्या तोंडी विनंतीमरून</u>**
**<u>उर्वरीत उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.</u>**

<u>समक्ष</u>
–/स्वाक्षरीत/–
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
<u>दिनांक– २६/०८/२०२५</u>

<u>श्रवणोत्तर स्वीकृती.</u>
–/स्वाक्षरीत/–
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद